KIRLOSKAR Vasundhara
Environment • Wildlife • Energy • Air • Water
International film festival
ZERO WASTE begins with us
KOLHAPUR 8 - 11 October 2015

Gala No. 7, First Floor, Shahu Stadium, Opp. Joshi Orthopedic Hospital, Near Gokhale College, Kolhapur 416012. Time : 6 To 8 p.m.

दिनांक : २४ सप्टेंबर, २०१५

प्रति,
मा. श्री. दिलीप बोरालकरजी,

सस्नेह नमस्कार,

मा. उर्मिला जोशी यांचेमार्फत दिलेले किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनाचे आमंत्रण आपण स्विकारल्याबद्दल सर्वप्रथम धन्यवाद !

किर्लोस्कर वसुंधरा महोत्सव हा पुणे येथे गेली ९ वर्षे किर्लोस्कर उद्योग समूह आणि क्लब वसुंधरा संयुक्तरित्या आयोजित करीत आहेत. या महोत्सवाचे एका चळवळीत रूपांतर व्हावे या हेतूने ४ राज्यामध्ये आणि सुमारे २० शहरांमधून हा चित्रपट महोत्सव प्रवास करतो आहे.

कोल्हापुरातील महोत्सवाचे हे ६ वे वर्ष आहे. कलामहर्षी बाबुराव पेंटर फिल्म सोसायटी आणि किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि. व क्लब वसुंधरा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षी वसुंधरे संदर्भातील एखादा महत्त्वाचा विषय घेऊन त्याचा चित्रपट आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून जागर करून लोकजागृतीचा प्रयत्न केला जातो.

२०१० साली 'वाघ वाचवा', २०११ साली 'जैव विविधतेचे रक्षण करा', २०१२ साली 'पर्यावरणपुरक जीवनशैली (Sastainable Lifestyle for All)', २०१३ ला 'जलसंरक्षण भविष्य रक्षण आणि २०१४ ला 'प्रयत्न छोटा बदल मोठा' त्याला अनुषंगीक 5 R's (Refuse, Reduce, Reuse, Recycle, Recover) हे विषय घेतले होते.

या वर्षीचे ध्येय वाक्य आहे 'O Waste शून्य कचरा' हा विषय घेऊन महोत्सवपूर्व शालेय चित्रकला स्पर्धा, लघुनाटिका स्पर्धा, आंतरमहाविद्यालयीन लघुपट स्पर्धा, महाविद्यालयीन युवा संसद, खुली मनोगत स्पर्धा, टाकावूतून टिकावू वस्तू निर्माण या स्पर्धा घेण्यात आलेल्या आहेत.

पर्यावरणाशी निगडीत विविध विषय घेऊन त्याला अनुषंगीक चित्रपट व विविध उपक्रम या महोत्सव काळात आयोजित केले जातात.

तसेच 'वसुंधरा मित्र', 'वसुंधरा गौरव' आणि 'वसुंधरा सन्मान' हे पुरस्कारही पर्यावरणविषयात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तींना दिले जातात. चार दिवसाच्या चित्रपट महोत्सवाचा तो एक भाग आहे. शिवाय विषयाला अनुषंगीक काही व्याख्याने व प्रात्यक्षिकेही घेतली जातात.

६ व्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय महोत्सवाचे उद्घाटन गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर २०१५ रोजी सायंकाळी ५:३० वा. शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर येथे आपल्या शुभहस्ते व्हावे अशी आमची सर्वांची इच्छा आहे. कृपया आपण ही विनंती मान्य करून महोत्सवाचे उद्घाटन करावे, ही विनंती.

कृपया आपली स्वीकृती कळवावी, ही विनंती.

दिलीप बापट
dilipbapat47@gmail.com
कलामहर्षी बाबुराव पेंटर फिल्म सोसायटी

कृष्णा गावडे
किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि.

समन्वयक : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव